औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक २१-१-२०१९ रोजी (का.प.क्रमांक २३) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक २१ जानेवारी २०१९ रोजी (दि.११-१२-१८ ची तहकूब व दि.१६-१-१९ ची पुढे ढकललेली सभा-का.प.क्र.२३) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी १२.१० वा. वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१.	स.स. श्री.विकास रतनलाल जैन
२.	स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद
३.	स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
४.	स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू
५.	स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण
६.	स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग
७.	स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
८.	स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव
९.	स.स. श्री.सुरे सीताराम इसराम
१०.	स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे
११.	स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
१२.	स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे
१३.	स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय
१४.	स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
१५.	स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद
१६.	स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ
१७.	स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ
१८.	स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल
१९.	स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी
२०.	स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन
२१.	स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम
२२.	स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे
२३.	स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
२४.	स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग
२५.	स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप
२६.	स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव
२७.	स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
२८.	स.स. श्री.अजीम अहेमद रफीक
२९.	स.स. श्रीमती साजेदा फारुखी सईद फारुखी

३०.	स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन
३१.	स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज
३२.	स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव
३३.	स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
३४.	स.स. श्री.एडके विकास प्रकाश
३५.	स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय
३६.	स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम
३७.	स.स. श्रीमती पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण
३८.	स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी
३९.	स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र
४०.	स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान
४१.	स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल
४२.	स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण
४३.	स.स. श्रीमती बनकर विजया संजय
४४.	स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद
४५.	स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव
४६.	स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव
४७.	स.स. श्री.सोहेल शकील शेख
४८.	स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे
४९.	स.स. श्रीमती मिना रामदास गायके
५०.	स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम
५१.	स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे
५२.	स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल
५३.	स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर
५४.	स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ
५५.	स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर
५६.	स.स. श्रीमती निकाळजे लता मगन
५७.	स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद
५८.	स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव
५९.	स.स.कु.जमादार सायली भागवत

मा.महापौर :सुरक्षा अधिकारी यांना सुचना देण्यात येते की, आता सभागृहात फक्त स.सदस्यांना प्रवेश द्यावा. अधिकारी,कर्मचारी यांना बाहेर थांबविण्यात यावे. जे अधिकारी, कर्मचारी सभागृहात गैरहजर आहे. त्यांना तात्काळ कारणे दाखवा नोटीस देऊन दंडात्मक कार्यवाही करण्याची वेळ पडली तर ती सुध्दा करावी.

श्री.अफसर खान :मागील सभेत एक प्रश्न केला होता त्यावर प्रशासनाने कार्यवाही केली नाही. आज मा.आयुक्त उपस्थित नाही. प्रश्नाची उत्तरे कोण देणार आहे? अनेक पदाचे चार्ज एक दुसरे अधिकारी यांचेकडे आहे. कोणतेही काम व्यवस्थित होत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आुयक्त सभेला आहेत की नाही? अनेक प्रश्न प्रलंबीत आहे. जर मा.आयुक्त नसेल तर सभा घेऊन अर्थ नाही. काही अधिकारी नाही. हि सभा मा.आयुक्त उपस्थित असतील तेव्हा घ्यावी.

श्री.अफसर खान :मा.आयुक्त असतील तेव्हाही सभा घ्यावी.

श्री.नासेर सिद्दीकी :अधिकारी सभेला उपस्थित नाही, मा.आयुक्तही नाही प्रश्नाची उत्तरे मिळणार नसेल तर सभा तहकूब करावी.

श्री.गजानन बारवाल :सदस्यांनी सुचना केली त्यानुसार सभा तहकूब करावी.

श्री.अजीम अहेमद :सभेला मा.आयुक्त नाहीत. अधिकारी जागेवर बसत नाही, कोणतेही काम होत नाही. फोन उचलत नाही, साईटवर आहे असे सांगतात. मा.आयुक्त सभेला उपस्थित नाही ते येतील तेव्हा हि सभा घ्यावी.

श्री.राजेंद्र जंजाळ :आजच्या सभेला ८० टक्के अधिकारी गैरहजर आहे. मा.आयुक्त ही उपस्थित नाही. आजच्या पेपरला बातमी आलेली आहे की, मा.महापौरांनी मंजूर केलेला ठराव उपआयुक्त यांचेकडून विखंडीत, मा.महापौर पाठपुरावा करतात म्हणून संधी नाकारली. सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या विरोधात उपआयुक्तांचा अभिप्राय यात होत असे की, अधिकाऱ्यांनी सभेला हजर राहायचे नाही. ज्या अधिकाऱ्यांनी हजर राहायचे त्यांनी सभागृहात घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात अशा प्रकारची कार्यवाही करणे वक्तव्य करणे योग्य नाही. हा सभेचा अपमान आहे. जो ठराव सभेने घेतला तो नेमका विखंडीत करण्याचे कारण काय होते? आतापर्यंत जे निर्णय घेतले गेले त्याची अंमलबजावणी झाली का? अनेक निर्णय घेतले ते दाखवू शकतो. उदा. मागिल दि.११-१२-१८ च्या सभेत विषय क्र.७७२ चा ठराव प्रशासनाने आणला होता. त्या प्रस्तावामध्ये असे होते की, जोपर्यंत नवीन पाणी उपलब्ध होत नाही तोपर्यंत नो-नेटवर्क ऐरीयामध्ये पाईपलाईन टाकू नका त्याचा पाणी पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. परंतु त्यावेळी आपण असे म्हटले होते की, जेव्हा पाणी उपलब्ध होईल तेव्हापाणी द्या, यानुसार सर्व संचिका मंजूर कराव्या तरी सुध्दा माझे वार्डातील एका संचिकेवर मा.आयुक्तांनी लिहिले की, नो-नेटवर्क भागामध्ये असल्याने हे काम करता येणार नाही. मनपाची आर्थीक परिस्थिती खराब असल्यामूळे मा.पालकमंत्री महोदय यांचेकडून निधी उपलब्ध करून त्या परिसरामध्ये पाण्याची पाईप लाईन टाकण्याचे ते काम होते. अंदाजपत्रक झाले, मंजूर केले, टेंडर झाले, जेव्हा संचिका एजन्सी फिक्सींगसाठी मा.आयुक्तांकडे गेली तेव्हा मा.आयुक्तांनी लिहिले की, हे नो-नेटवर्क भागात असल्यामूळे काम करू शकत नाही. सभेच्या निर्णयाचा प्रत्येक वेळी अपमान करायचा बरोबर नाही. जो आदेश दिला जाईल त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. यात मा.महापौराचा सुध्दा अपमान आहे. जेव्हा नियुक्ती प्राधिकरण असतांना जर एखाद्या नियुक्ती बाबतीत ठराव पारीत करीत असेल व त्यावर वेगळी कारणे देऊन मंजूर होत नसेल तर योग्य नाही. असे होत असेल तर त्या अधिकाऱ्यांना सुध्दा येथे राहण्याचा अधिकार नाही. या सर्व बाबतीत समाधानकारक खुलासा घ्यावा.

मा.महापौर :सभागृहात विहित वेळेत अधिकारी हजर राहणे आवश्यक आहे. जे गैरहजर आहे, त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी. मा.आयुक्त यांची तब्बेत बरोबर नसल्याने ते हजर राहू शकणार नाही. तसे त्यांनी कळविले आहे. त्यांना

परवानगी दिली आहे. स.सदस्य श्री.जंजाळ यांनी पाण्याचा प्रश्न उपस्थित केला त्या बाबत नो-नेटवर्क ऐरिया म्हणजे पाण्याच्या बाबतीत जनतेशी नेटवर्क होऊ शकत नाही. नेमके नो-नेटवर्क ठरविण्याचे निकष काय? सगळ्याच संचिकेवर असे लिहिणे योग्य आहे का त्या भागात रस्ते झाले लाईट आहे. मग पाणी लाईन का नाही?

श्री.राजेंद्र जंजाळ :पाईप लाईन टाकावी यासाठी सांगतो की, लगेच तेथे सिमेंट रस्ता करायचा आहे. त्याची वर्क ऑर्डर झालेली आहे. म्हणजे आता मंजूरी होणार नाही. रस्ता होणार पुन्हा पाण्याच्या लाईनसाठी रस्ते खोदणार हे योग्य नाही. देशमुख नगरची टाकी ताब्यात घेतली. त्यात पाणी टाकावे त्यातून पाणी द्यावे. अनेक वेळा सांगीतले कार्यवाही होत नाही. जेथे बिल्डराच्या सोसायटी नो-नेटवर्क ऐरिया आहे. तेथे पाणी दिले गेले. पाईप लाईन टाकली. परंतु जेथे गरीब दलित लोक राहतात, तेथे शासनाने पैसा दिला ते काम करण्यास तयार नसेल तर योग्य नाही.

मा.महापौर :दलित वस्ती निधी आलेला आहे. शासनाचा पैसा आहे. तो वापरून घ्यायला पाहिजे. नो-नेटवर्क ऐरिया दोन ओळी टाकून सर्व संचिका बाजूला करीत आहे. प्रशासनाचे हे धोरण योग्य नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :नो-नेटवर्क म्हणजे तेथे टॅक्स वसूल होत नाही का बांधकाम परवानगी देत नाही का?

मा.महापौर :एक निर्णय असा झाला की, चार ठिकाणी अंदाजपत्रक मंजूर वर्कऑर्डर तयार आहे. सब्जेक्ट टू वॉटर ॲबीलीटी क्रॉस कनेक्शन नंतर करू. पहिले काम करून घेऊ असे ठरले होते. प्रशासनाने सुध्दा होकार दिला होता. परंतु अधिकारी स्वतः वेगळा पायंडा पाडून सभागृहाचा अवमान करीत असेल व निर्णयानुसार कार्यवाही होत नसेल तर सभागृहाला कार्यवाही करावी लागेल. किती संचिकेवर नो-नेटवर्क ऐरिया लिहिले गेले?

श्री.राजेंद्र जंजाळ :मा.आयुक्तांनी लिहिले आहे. खालचे अधिकारी लिहितात की, येथे काम करणे आवश्यक आहे असे असतांना मा.आयुक्त त्यावर नो-नेटवर्क भाग आहे, काम करता येत नाही असे सांगतात. बाजूच्या गल्लीत पाणी आहे येथे पाणी देत नाही. उद्या या संचिकेवर सही झाली नाही तर तेथील सर्व लोक मा.आयुक्तांच्या निवासस्थानी जातील.

मा.महापौर :हे काम शासनाच्या निधीतून होत आहे. यात मनपाचा फायदा आहे. निधी आणण्यासाठी सदस्यांनीही प्रयत्न केले. कोणतेही कारण सांगून असे संचिका नामंजूर करणे योग्य नाही. आजचा संदर्भ देऊन मान्य संचिकेला मान्यता करावी.

श्री.जमीर कादरी :नो-नेटवर्क ऐरिया हे प्रश्न चार वर्षापासून आहे. यासाठी स्पेशल सभा आयोजित करावी. सर्व अधिकाऱ्यांना बोलवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :ठराव मंजूर केला. तोच प्रश्न उपस्थित करतो. आता वेगळी बैठक घेण्याची गरज नाही. जेव्हा समांतर योजना बंद केली, तेव्हा मा.आयुक्तांनी म्हटले होते की, मनपाकडे मोठे मॅन पावर आहे. सर्व काही करू शकतो पाणी बंद होऊ देणार नाही. दुसरे मा.आयुक्त सांगतात की, नो-नेटवर्क भागात लाईन टाकली

तर पाणीपुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. असे होत असेल तर पाणीपुरवठा व्यवस्थीत करण्याचे काम कुणाचे आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :मा.आयुक्त साहेब सभेला नाहीत. जे मा.आयुक्त म्हणून आहे ते निर्णय घेऊ शकतात का? श्री.कोल्हे पण आजच्या सभेला नाही.

मा.महापौर :श्री.फालक यांनी श्री.जंजाळ यांचे वार्डातील पाईपलाईनच्या संचिकेवर ताबडतोब कार्यवाही करावी. नसता तो निधी परत जाऊ शकतो.

श्रीमती मिना गायके :माझे वार्डातील दुषीत पाण्याची संचिकेला मंजूरी द्यावी. पाईप येत आहे, असे सांगण्यात येते. काम कधी होणार आहे?

मा.महापौर :श्री.फालक यांनी पाहणी करावी, कार्यवाही करावी.

श्री.गजानन बारवाल :पदमपूरा भागात दुषीत पाण्यामूळे काही लोकांना गॅस्ट्रो झाला, ॲडमीट आहे. दुषीत पाण्याचा प्रश्न कार्यवाही होत नाही. माझे वार्डातील दोन्ही कामे करावी.

मा.महापौर :एक निर्णय घेतला आहे मा.आयुक्तांनी मान्य केले आहे. चार-पाच ठेकेदार आहे. त्यांनी काम घेतले परंतु ते पेमेन्ट अभावी काम करीत नाही. त्यासाठी मनपाच्या माध्यमातून १ कोटी रूपये देखभाल दुरूस्ती व २ कोटी रूपये जे मुळ कामे पाण्याची कामासाठी असेल हे तत्वत: मा.आयुक्तांनी मान्यता दिली. ते पत्र संबंधीत विभागाकडे येईल. ३ कोटी रूपयाचे वाटप कसे करायचे? मा.आयुक्तांशी बोलणे झाले, त्यांचे अप्रोल करून संबंधीतांना पेमेंट देऊन कार्यवाही करावी. पेमेंट थकले म्हणून ठेकेदार काम करीत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :अनेक बिले थाबंली आहे. लेखा विभागाचा चार्ज कुणाकडे आहे? पाटणी यांनी चार्ज घेतला नाही. प्रशासनाचे आदेश पाळले जात नाही.

उपअभियंता श्री.फालक :श्रीमती गायके ताई यांचे वार्डातील कामाचे टेंडरसाठी दिले आहे.

मा.महापौर :पाणी पुरवठ्यासाठी रुपये ३ कोटीची प्रोव्हीजन केली आहे. किमान मटेरियलसाठी तरी पैसे द्यावे असे म्हणने आहे. संबंधीतास पैसे दिले जातील व कामे सुरू होतील.

श्री.अफसर खान :प्रबुध्दनगर दलित वस्ती मध्ये सन-१९९५ ची जुनी पाईप लाईन खराब आहे. त्यात ड्रेनेजचे पाणी मिक्स होऊन येत आहे. तेथे नवीन लाईन टाकणेसाठी १० पाईप लागतात. अनेक वेळा श्री.कोल्हे यांना सांगूनही कार्यवाही होत नाही. ४ पाईप पाठविले ६ पाईप कमी पडतात. लोक माझे घरी प्रश्न घेऊन येत आहे.

श्रीमती मिना गायके :माझे वार्डात लाईट बंद आहे. प्रत्येक वेळी दोन दिवस लागतील असे सांगतात.

उपअभियंता-श्री. देशमुख:दोन दिवसात काम केले जाईल एलईडी कंपनीशी चर्चा केली आहे.

मा.महापौर :लाईट विभागाचे श्री.देशमुख यांना ५,०००/- रू चा दंड लावण्यात येतो.

श्री.सिताराम सुरे :दंड देऊन उपयोग नाही यांना सक्तीच्या रजेवर किंवा घरी पाठवावे.

मा.महापौर :प्रत्येक वेळेस सभागृहात चर्चा होते व सभेचे आदेश लाईट विभागाचे अधिकारी कर्मचारी पाळत नसेल तर योग्य नाही. यात सुधारणा झाली नाही. काम केले नाही तर, त्यांच्यावर कार्यवाही करावी. त्यांचे सर्वीस बुक मध्ये तशी नोंद घ्यावी.

श्री.अफसर खान :एक दुसरेचे नाव अधिकारी सांगतात. देखभाल दुरूस्तीचे काम दिले जाते. सांगतात की, एलईडीवाले करणार आहे. माझे वार्डात २५ लाईट बंद आहे. दोन महिनेपासून लाईट बंद आहे.

मा.महापौर :सभेचे आदेश पाळले जात नाही. आज दंडात्मक कार्यवाही, काम केले नाही तर अधिकारी यांचेवर निलंबणाची कार्यवाही सुध्दा होईल. श्रीमती गायकवाड, श्री.जोशी, श्री.खमर असतील सर्वांवर कार्यवाही होईल. सर्वांना सरसकट दंड करणेबाबत कार्यवाही करावी.

श्रीमती ज्योती पिजंरकर:सहा महिन्यापासून ८० टक्के लाईट बंद आहे.

मा.महापौर :जे-जे कर्मचारी काम करणार नाही. आऊट सोर्सींगचे कर्मचारी असेल तरी त्यांच्यावरही कार्यवाही करावी.

श्री.फेरोज खान :श्री.बनसोडेही काम करीत नाही. फोन घेत नाही.

मा.महापौर :पुढील सभेत एजन्सीला येथे बोलविण्यात येईल.

श्री.विकास जैन :महापालिकेचे लाईनमन आहे. त्यांचेकडून काम करून घ्यावे. पुर्ण एलईडीचे एजन्सीकडे काम सोपवितात हे योग्य नाही. जर ते काम करीत असेल तर सदस्यांना वार्डात गेल्यानंतर भेट घेतात का?

उपअभियंता-श्री.देशमुख:महापालिकेत मी एकटा ३० वर्षापासून काम करतो. कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.

मा.महापौर :श्री.देशमुख यांचे प्रमाणेच इतरही लोक जबाबदार आहे. काम करतात तर तक्रारी का येतात? लाईनमन आहे, आऊटसोर्सींगचे लोक आहे. एलईडीला काम दिले तर तक्रारी कमी का होत नाही?

उपअभियंता श्री.देशमुख:कॉम्प्रेसिव्ह एजन्सीने सध्या बंद केले आहे.

श्री.फेरोज खान :एलईडीचे लाईट लावणेसाठी किती कालावधी दिला? किती लाईट एजन्सीने लावले आहेत?

श्री.विकास जैन :कॉम्प्रेसिव्ह लाईटचा ठेका बंद केला तर पर्यायी व्यवस्था काय केली?

उपअभियंता-श्री.देशमुख:मी सभागृहाची नाराजी व्यक्त करतो की, मी रात्रदिवस काम करीत असेल व जो निर्णय दिला तो योग्य वाटत नाही.

श्री.फेरोज खान :मा.महापौर हे या सभागृहाचे सक्षम प्राधिकारी आहे. अधिकारी असे बोलत असेल तर योग्य नाही.

उपअभियंता श्री.देशमुख:माझे शब्द मी परत घेतो.

मा.महापौर :ही कार्यवाही श्री.देशमुख वरच नाही. पुर्ण विभागाचे कर्मचारी जबाबदार आहे. जर सर्वच कर्मचारी समाधानकारक काम करणार असेल तर जो दंड लावण्याचा निर्णय घेतला तो माफ करण्यात येईल नसता हा निर्णय कायम राहिल.

श्री.सिताराम सुरे :पिसादेवी भागात भक्तीनगर भागात आजपर्यंत अंधार आहे. जुने लाईट लावले कनेक्शन नाही. बाजूच्या आरतीनगर भागात उजेड आहे. ३० वर्षापासून देशमुख यांचे कामाचे आऊटपुट काय आहे? यांचे म्हणने की, पाचवी वायर टाकली नाही. लेखा विभागात संचिका सहा महिन्यापासून आहे.

मा.महापौर :श्री.देशमुख यांचे प्रमाणे तीन अधिकारी लाईट विभागात आहे. त्या वायरचे पैसे भरणा केले का? एमएसईबीला एक पत्र द्यावे की, त्याचे जे पैसे भरायचे ती संचिका लेखा विभागात प्रलंबीत आहे. लगेच मंजूर करण्यात येईल या अटीवर तसे त्यांना पत्र पाठवावे.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगाव मनपा शाळेला एनजीओने आरओ दिला तो बसवून देणेसाठी लाईट विभागास मागणी केली. फोन केला, उचलत नाही मा.श्री.बकोरिया साहेबांना

फोन केला. एक तासात ते आरओ लावून घेतला. हे काम आपले अधिकारी करू शकत होते.

श्री.अजीम अहेमद :नेहरूनगर भागातील डीपी शिफ्ट होत नाही. पैसे भरले आहे.

श्रीमती सिमा चक्रनारायण:टू सेटवर थ्री सेट बसविता येत नाही का?

मा.महापौर :स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या त्यानुसार कार्यवाही करावी. भक्तीनगर भागात लाईट लावावे. स्मशानभुमीतील लाईट आठ दिवसात काम करावे. चांगले काम केले नाही तर या विभागातील सर्व कर्मचाऱ्यांवर निलंबणाची कार्यवाही केली जाईल. एजन्सीला बोलवून घ्यावे. मेन्टेनन्सचे काम करून घ्यावे.

श्री.सचीन खैरे :मकबरा रोडवर ७५ वॉटचे लाईट बंद आहे. १५ मीटर रोडवर ३१ वॉटचे लाईट बसवतात. याचे नॉमस काय आहे? देखभाल दुरूस्ती होत नाही, अधिकारी लक्ष देत नाही.

मा.महापौर :एलईडीचे काम बघणारे जे अधिकारी असतील त्यांना पुढील सभेत बोलविण्यात यावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :आजच्या वर्तमानपत्रात ज्या बातम्या आलेल्या आहे त्याचा खुलासा करावा.

मा.महापौर :आजच्या वर्तमानपत्रात बातम्या आल्या की, महापौरांना धडा शिकविणेसाठी उपआयुक्तांकडून ठराव विखंडीत, महिला कर्मचाऱ्यांवर महिला उपआयुक्त यांचेकडून अन्याय ठराव विखंडीत, पुर्वीच पत्र तसेच महापौर पाठपुरावा करतात म्हणून नाकारली संधी उपआयुक्तांचा अभिप्राय, महापौर पाठपुरावा करतात म्हणून ठरावाच्या विरोधात अभिप्राय ठराव विखंडीत होणेपुर्वीच दिले पत्र, असे आलेले आहे. संबंधीतास पत्र दिले त्यात विषय क्र.५९१ च्या ठरावाचा उल्लेख करून पत्र दिले की, कायमस्वरूपी नियुक्ती देता येत नाही. या बाबत सदस्य श्री.जंजाळ यांनी माहिती मागीतली आहे खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) :सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने या प्रकरणाची टिप्पणी मा.आयुक्तांकडे सादर केली होती. यात मा.आयुक्तांच्या मान्यतेने आता सध्या संचिका माझेकडे नाही. संबंधीत अर्जदार वारंवार तगादा करीत होते त्यानुसार त्यांना लेखी कळविले आहे.

श्री.राजेंद जंजाळ :प्रोसेस काय आयुक्तांचे काय म्हणणे आहे? याशी घेणे देणे नाही. वर्तमानपत्रात जे आले की, उपआयुक्तांनी हा ठराव विखंडीत केला आहे त्याचा खुलासा पाहिजे. सभागृहाने घेतलेला निर्णय विखंडीत करणेचा अधिकार उपआयुक्तांना आहेत का?

उपआयुक्त (महसूल) :वृत्तपत्रात आम्ही कुठलीच बातमी दिले नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :हा ठराव विखंडीत झालेला आहे का? हा ठराव विखंडीत करणेसाठी पाठविला का? कोणत्या कारणाने पाठविला? व तो पाठविण्याचे अधिकार आहेत का?

मा.महापौर :सदस्यांचे थोडक्यात म्हणने आहे की, प्रिमॅच्युवल ज्याला म्हणतो एखाद्या ठरावावर शासनाने शिक्कामोर्तब केले तो ठराव विखंडीत झाला तर त्यावेळचे जे पत्र आहे प्रिमॅच्युवल दिलेले आहे. हा सभागृहाचा अवमान आहे. हा हक्क भंग आहे. या बाबत योग्य खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) :अर्जदार हे पाठपुरावा करीत होते.

मा.महापौर :आमच्या समोर व्यक्ती अर्जदार नाही तर प्रशासन, शासन व सभागृह आहे.

श्री.राजेंद्र जंजाळ :सभेने घेतलेला ठराव अमान्य/विखंडीत करण्याचा अधिकार उपआयुक्तांना आहेत का? कोणत्या अधिकारात त्यांनी संबंधीतास पत्र पाठविले. सभेने घेतलेल्या निर्णयावर अंमलबजावणी करण्याचे काम यांचे आहे. जर सभागृहात झालेल्या निर्णयाशी प्रशासन सहमत नसेल तर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क्र.४५१ प्रमाणे राज्य शासनास विखंडीत करण्यास पाठवावा लागतो ते पाठवितांना त्यासाठी काही कारणे ॲक्ट मध्ये दिले जे की अधिकाराच्या मर्यादेबाहेरचा आहे. शांततेचा भंग होण्याचा संभव आहे. लोकास किंवा व्यक्तीच्या गटास/वर्गास इजा किंवा त्रास होण्याचा संभव, आर्थीक नुकसान होऊ शकेल असे असेल तर विखंडीत करणेसाठी पाठविता येतात. तर या ठरावात काय म्हणून विखंडीतला पाठविले? उपआयुक्तांना काय म्हणायचे आहे? सर्व खुलासा करावा.

मा.महापौर :महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम क्र.४५१ असे आहे जर एखादा ठराव अधिनियमाच्या मर्यादेबाहेरचा घेतला असेल तर तो विखंडीत करता येतो. कुणास त्रास किंवा परिणाम होत असेल तर विखंडीतला पाठविता येतो. अशी परिस्थिती यात नाही. ठोस कारण नाही. सभागृहाचा निर्णय डावलून निर्णय घेत असेल तर योग्य नाही. महापौरांचा त्या व्यक्तीचा तगादा आहे. हे कारण होऊ शकत नाही. प्रशासनाचे कामकाज व्यक्ती किंवा कुणाच्या सांगण्यानुसार चालत नाही. त्यासाठी ॲक्ट बनवलेला आहे. अधिकारी यांनी काय काम करायचे? हे त्यात आहे. कुणाच्या मर्जीने हे चालत नाही. नेमके या प्रकरणात कारण काय? असा निर्णय घ्यावा लागला.

श्री.राजेंद्र जंजाळ :जे पत्र संबंधीतास दिले ते कोणत्या नियमानुसार दिले? व कुठे नियमात दिले आहे? त्यांना नियुक्ती द्यावी किंवा देऊ नये असा प्रश्न नाही. सभेने निर्णय दिला तो नाकारण्याचा अधिकार उपआयुक्तांना आहेत का? असेल तर कोणत्या नियमानुसार आहे? तो खुलासा करावा.

उपआयुक्त (महसूल) :मा.आयुक्तांची मान्यता घेतलेली आहे.

मा.महापौर :६७-२ नुसार हे लोकल सेल्फ गर्व्हमेंट आहे. शहराचे महापालिकेच्या हिताचे निर्णय घेण्याचे अधिकार सभागृहाला आहे. हित जपणे किंवा एखादा ठराव विखंडीत होत नाही. त्यानुसार त्या अनुषंगाने कार्यवाही करणे यथोचित नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :आताच सांगण्यात आले की आयुक्तांची मान्यता घेतली. आता मा.आयुक्तांनी उत्तर द्यावे की, कोणत्या नियमाच्या आधारे यास मान्यता दिली? त्यांना माहित नसेल तर सचिवाकडून खुलासा घ्यावा. पान क्रमांक ३७६ वर सर्व नियम दिले आहे.

मा.महापौर :जो निर्णय त्या संचिकेमध्ये घेतला त्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तो कुठल्याच नियम व कायदयाला अनुसरून निर्णय घेतला. तगादा करीत आहे म्हणून निर्णय घेतला हे कारण असू शकत नाही. ज्या नियम व अटी आहे ॲक्ट नुसार महापालिकेचा कारभार चालतो. हे वरीष्ठांनी बघीतले पाहिजे त्यांचे निदर्शनास आणून दिले पाहिजे होते. लिगलचे ओपिनियन का घेतले नाही? सदस्यांनी जे स्पेसिफिक विचारले त्यांचे उत्तर द्यावे. कलम वाचण्याची गरज नाही. ते आम्हाला माहित आहे.

नगर सचिव :(पान क्रमांक ३७६ वर जे नियम आहे ते सचिव ४५१ वाचून दाखवतात.

श्री.राजेंद्र जंजाळ :असेच एक प्रकरण श्री.प्रमोद विश्वासराव घोडगे विरुध्द राज्य शासन झाले होते. त्यांची नोंद महाराष्ट्र लॉ जनरल ६४३ मध्ये घेण्यात आली. अधिकाऱ्याचा अभिप्राय मागविण्यात आला नसला तरी अपील प्राधिकरणाने घेतलेला निर्णय बेकायदेशीर नाही. जो निर्णय या सभागृहाने घेतला तो बेकायदेशीर ठरविता येत नाही. असे कोर्टाने सुध्दा सिध्द केले आहे. असे सर्व असतांना एका अधिकाऱ्याला वाटते की, हे काम करायचे नाही. म्हणून असे पत्र पाठवायचे. मनपाच्या नियमाने काम होत नाही. अधिकारी मनमानी करीत आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. सभेमध्ये अनेक निर्णय झाले त्याची अंमलबजावणी होत नाही. सर्व प्रश्नाची उत्तरे मला लेखी स्वरूपात २-३ दिवसात मिळावी.

श्रीमती ज्योती अभंग :संबंधीत महिला कर्मचारी २४ वर्षापासून कार्यरत आहे. तगादा लावला म्हणून त्यांना पत्र देण्यात आले की, कामावरून काढून टाकण्यात येते. माझे वार्डात असलेले कर्मचारी यांनी एसआय यांना शिवीगाळ मारण्याची धमकी दिली. त्याची बदली केली गेली, त्या संदर्भात ते कर्मचारी श्रीमती मुथा मॅडम यांना भेटले. माझी बदली पुन्हा त्या ठिकाणी करावी. या संदर्भात मी उपआयुक्त मुथा मॅडम यांना बोलले की, संबंधीतांनी शिवीगाळ केली पुन्हा माझे वार्डात बदली करता हे योग्य नाही. त्यावर उत्तर न देता उलट मला सांगता की, तुमचे वार्डातील लोक आले होते. विकास कामावर तुम्ही लक्ष देत नाही. हा कोणता प्रश्न होऊ शकतो? आमच्या संचिकेवर निर्णय होत आहे. पुन्हा त्या कर्मचाऱ्याला माझे वार्डात पाठविले. असे काम अधिकारी करीत असेल तर त्यांना शासनाकडे परत पाठवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :आम्ही एवढी मेहनत करतो. संचिका तयार करून देतो, निधी आणतो तरी काम होत नाही. रिमार्क मारला जातो. उलट सदस्यांला विचारले जाते की, तुम्ही वार्डात काम करीत नाही.

श्री.सिताराम सुरे :शासनाकडील अधिकारी कुठे काम करतात? माहित नाही त्यांना ट्रेनिंग दिली पाहिजे. मा.आयुक्तांनी किंवा नगरविकास विभागाच्या माध्यमातून ट्रेनिंग दिली जावी.

मा.महापौर :दिनांक ६-८-२०१८ रोजीच्या सभेतील विषय क्रमांक ५९१ वर चर्चा चालू असतांना त्या ठरावावर विखंडीत करणेचा जो निर्णय प्रशासनाने घेतला, ठोस कारण दिसून येत नाही. मनपाचे कलम ६७-२ च्या तरतुदी प्रमाणे शहरातील पालिका शासन महापालिकेमध्ये विहित असेल त्याचाच अर्थ शासन म्हणून निर्णय घेण्याचे अधिकार संपूर्णपणे महापालिकेत या सभागृहास आहेत. विशिष्ट प्रकरणामध्ये कोणताही प्राधिकरणाचा ठराव विखंडीत करण्याचे झाल्यास त्यासाठी स्पेशीफिक कारण द्यावे लागते. या प्रकरणात कोणतेच ठोस व स्पेशिफिक कारण नाही. त्यामूळे आर्थीक हाणी महापालिकेचे हित जपणे किंवा लोकास इजा व त्रास होण्याचा संबंध नाही. असे स्पष्ट नमूद आहे. सभागृहाचेही तेच म्हणणे आहे. सभागृहाच्या निर्णयाची अंमलबजावणी करायची किंवा नाकारायचे प्रिम्पॅचवल म्हणजे निर्णय होणे आधीच निर्णय घेणे हा सभागृहाचा अवमान आहे. अशी कार्यवाही करणे चुकीची आहे. दै.वेतनावरील कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो. अशा कर्मचाऱ्यांना हेतुपुरस्कार

डावलतो आहे का? कर्मचारी कोण आहे? ते आमच्या डोळ्या समोर नसते. जेव्हा कामकाज चालते तेव्हा समान न्याय द्यावा लागतो. त्याअनुषंगाने तो निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. जर तगादा लावतात, मा.महापौर दबाव टाकतात असे म्हणणे असेल तर त्याचा खुलासा सादर करावा लागेल. वर्तमान पत्रात बातम्या येतात. महापौर सर्वोच्च पद आहे. संबंधीतास खाजगीत जरी अधिकारी बोलले असाल तर ते चुकीचे आहे. चौकटीत राहून अधिकारी यांनी काम करावे. श्रीमती अभंग ताई यांना जे उपआयुक्त बोलले ते चुकीचे वक्तव्य आहे. आम्हाला वेळ प्रसंगी सर्व कामे नागरीकांसाठी करावे लागतात.

श्री.अजीम अहेमद :वार्डात पाणी येत नाही. फोन केला तर आता ४५ मिनिट पाणी मिळेल असे सांगण्यात येते.

मा.महापौर :ज्या समस्या स.सदस्य मांडतात, सुचना करतात ते प्रश्न सुटले जावे तसे कार्यालयीन परिपत्रक काढून अधिकारी यांना समज द्यावी. नागरीकांना पाणी मिळाले. श्रीमती अभंग ताई यांनी जी तक्रार मांडली तसे अधिकारी सदस्यांना यापूढे बोलले तर दखल घेतली जाईल. ठराव क्रमांक ५९१ च्या अनुषंगाने त्याच संचिकेमध्ये लिहिले की, शासनाचे मार्गदर्शन घ्यावे तर दुसरीकडे विखंडीत करण्याबाबत लिहिले जाते सभेने ठराव घेतल्यानंतर दिशा कशी बदलती प्रशासनच संभ्रम अवस्था आहे. या ठरावावर सकारात्मक दृष्टीने कार्यवाही व्हावी असे सभागृहाचे मत आहे. या ठरावानुसार पुर्नविचार करावा व त्या महिला कर्मचारी यांना न्याय देण्याचा प्रयत्न करावा. गरज पडली तर शासनाचे मार्गदर्शन घेऊन त्यांना न्याय द्यावा. हि जी कार्यवाही झाली त्याची चौकशी आयुक्त म्हणून श्री.भालसिंग यांनी करावी. त्याचा अहवाल पुढील सभेत द्यावा.

श्री.सिताराम सुरे :नवीन सीटी बसचा लोकार्पण सोहळा केला. बसच्या डिझाईनसाठी जाहिरात दिली होती. त्यामध्ये ३०० कलाकारांनी भाग घेतला. त्यापैकी श्री.श्रीकांत मोरे नावाचे व्यक्ती त्याचे डिझाईन फायनल केले. त्यानुसार बस तयार केल्या. त्यांना असे सांगण्यात आले की, २५ हजार बक्षीस म्हणून देणार होते. एक महिना झाला त्यास रक्कम दिली नाही. देणे होत नसेल तर घोषणा यापूढे करू नये. रक्कम देणार असेल तर ठिक आहे, देणार नसेल तर तसे पत्राने त्यांना कळवावे.

मा.महापौर :महत्वाचा विषय आहे. आपण घोषणा केली, त्याचा सत्कार केला, मानधन देण्याचे राहिले आहे. दिलगिरी व्यक्त करतो. २६ तारखेला प्रशासनाने संबंधीत व्यक्तीस बोलवून घ्यावे त्यास मानधन दिले जाईल.

श्री.अफसर खान :वार्डात पाईप लाईनचे काम होत नाही ४ पाईप लागणार आहे.

मा.महापौर : श्री.फालक यांनी पाहणी करावी कार्यवाही करावी.

श्रीमती नरगीस शेख : केजीएम हॉस्पीटल कार्यान्वित होत नाही.

मा.महापौर :मा.आयुक्तांकडे संचिका आहे कार्यवाही होईल. मशीनरीमूळे काम थांबलेले आहे.

अति.आयुक्त :केजीएम हॉस्पीटलच्या बाबतीत आकृतीबंध करायचा होता तो झालेला आहे. ज्या मशीनरी लागतील काही सलेक्ट केल्या काही मशीनरीचे प्रोसेस चालू आहे. टेंडर केले होते. प्रतिसाद मिळाला तर दोन महिन्यात कार्यवाही होईल.

श्री.नासेर सिद्दीकी :रेट अबाऊमध्ये आले. संक्शन केले तर एजन्सी समोर येईल.

श्रीमती सुरेखा सानप :श्री.दिक्षीत नावाचे व्यक्ती यांनी दिनांक २६-३-२०१२ रोजी प्लॉट खरेदी केला होता. दिनांक १२-१२-१८ पर्यंत त्यांना कराच्या बाबतीत कोणतीही नोटीस दिली नाही. त्यांनी स्वत:हून अर्ज केला, त्यांना कर लावला, तो २४९९२/- त्यावर दोन टक्के शास्ती ११९७२/- रू आकारले.

कर निर्धारक व संकलक:मी स्वत: प्रकरणात लक्ष घालतो.

मा.महापौर :चुक झाली असेल तर दुरूस्ती करणेची कार्यवाही करावी. तसेच मदतीचे प्रस्ताव मंजूर केले त्यात महापौर म्हणून नवीन लेखाशिर्ष उघडावे. त्या शिर्षकाखाली प्राथमिक स्वरूपात सुरूवातीला रु.२ कोटीची तरतूद त्यात करावी. जेवढे मदतीचे प्रस्ताव मंजूर करतो. त्यातून मदत द्यायची महापौरांचे पत्र घ्यावे ताबडतोब करावी. मदतीचे प्रस्ताव निकाली काढावे.

श्रीमती सुरेखा सानप :१० वीच्या विद्यार्थ्यांना बक्षीस स्वरूपात रक्कम देतो, ती दिली नाही.

श्री.मनोज बल्लाळ :माझे वार्डात मागिल वर्षी जुना मोंढा भागात रस्त्याचे उदघाटन केले होते. काम चालू झाल्यानंतर ते काम बरोबर होत नाही म्हणून पत्र दिले. तीन ठिकाणी पॅच खराब झाले. पेपरला पण आलेले आहे. आमचे नाव खराब होते. जे काम खराब झाले ते काम करून घ्यावे त्यानंतर बील द्यावे. श्री.कोल्हे यांचेकडे चार्ज नसतांना बीलावर त्यांनी सही केली. विचारले असता आर.ए. बील केले सांगता. रु.१० लक्षचे काम अजून बाकी आहे. १० टक्के रक्कम थांबून ठेवली सांगता. जोपर्यंत काम करीत नाही तोपर्यंत बील थांबवावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :याच ठेकेदाराने माझे वार्डात काम घेतले तेही अर्धवट असून काम न करता आर.ए.बील काढायचे अशी पध्दत बरोबर नाही. काम पुर्ण होत नाही तोपर्यंत कोणत्याच प्रकारचे बील अदा करू नये.

श्री.मनोज बल्लाळ :शहरात रस्त्यावर मंडप टाकतात ते लोक परवानगी नसतांना २-४ दिवस ठेवतात. वाहतूकीस अडथळा निर्माण होतो.ते परवानगी घेता का? मी पत्रही दिले होते.

<u>विषय क्रमांक ८९३:-</u>

प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.९८, उल्कानगरी येथील रुद्र फोर्ट ते श्री.कचेश्वर प्लॉट क्रमांक-२४२ यांच्या घरापर्यंत मंजुर रेखांकनातील १५ मी.रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एस.एस.आर.सन २०१८-२०१९ नुसार रक्कम रुपये १,४९,९९,३३१/-चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक ०७.०१.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाकरीता आर्थिक तरतुद ही मनपा अर्थसंकल्प नविन कॉंक्रीट रस्ते सन २०१८-१९ मध्ये मंजुर रेखांकनातील नविन कॉंक्रीट रस्ते, जी.बी.आर., झोन क्र.०७, पृष्ठ क्र.७५, अ.क्र.४४, तरतुद रक्कम रु.१.५० कोटी उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १,४९,९९,३३१/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा आदेशास्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

<u>ठराव:-</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९८, उल्कानगरी येथील रुद्र फोर्ट ते श्री.कचेश्वर प्लॉट क्रमांक-२४२ यांच्या घरापर्यंत १५ मी.रुंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाच्या र.रु.१,४९,९९,३३१/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ८९४:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०७, पैठण रोड, नाथ सिड्स मागील नाथ सिड्स ते दिशा संस्कृती या विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रकास यापुर्वी मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.४७०,दि.१८.०६.२०१६, र.रु.१,७८,८४,५२१/- करीता मान्यता झालेली आहे. सदर कामाची निविदा मंजुरी अंती श्री.मोहम्मद अहेमद सिद्दीकी यांनी ९.४७ टक्के कमी दराने स्विकारली आहे व काम प्रगतीपथावर आहे. प्रस्तावीत कामाव्यतिरिक्त याच कामालगत असलेला पैठण रोड ते दिशा संस्कृती (कृषी विद्यालय लगत) हा मुख्य रस्ता अत्यंत खराब झालेला आहे व सदर रस्ता हा या भागातील अनेक नव्याने विकसीत झालेल्या वसाहतीला जोडणारा मुख्य व वाहतुक वर्दळीचा रस्ता आहे. त्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामा करीता रक्कम रु.२८,६५,०००/- इतका जास्तीचा खर्च अपेक्षित आहे. करीता कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.२,०७,४९,५२१/- इतकी होत आहे.

सदरील कामाची निविदा ९.४७ टक्के कमी दराची आहे. त्यामुळे मुळ निविदा रक्कमेमध्ये होणारी बचत (र.रु.१९,६४,९८०/-) व अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १० टक्के मर्यादेत वाढीव काम होणार आहे. करीता कामाचे सुधारीत अं.प.र.रु.२,०७,४९,५२१/- इतके मान्यतेस्तव तसेच वाढीव काम मुळ कंत्राटदार श्री.मोहम्मद अहेमद सिद्दीकी यांच्या मार्फत मंजुर निविदा दराने म्हणजे अं.प.दरापेक्षा ९.४७ टक्के कमी दराने करून घेण्याच्या प्रस्ताव मा.सर्वसधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०७, पैठण रोड, नाथ सिड्स मागील नाथ सिड्स ते दिशा संस्कृती या विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या प्रगतीपथावर असलेल्या कामाव्यतिकरीक्त याच कामालगत असलेला पैठण रोड ते दिशा संस्कृती (कृषी विद्यालय लगत) हा मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने या कामाकरीता अपेक्षीत रु.२८,६५,०००/- इतका जास्तीचा खर्चासह सुधारीत अं.प.र.रु.२,०७,४९,५२१/- अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. तसेच वाढीव काम मुळ कंत्राटदार श्री.मोहम्मद अहेमद सिद्दीकी यांच्या मार्फत मंजुर निविदा दराने म्हणजे अं.प.दरापेक्षा ९.४७ टक्के कमी दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ८९५:-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, खालील नमुद कामांसाठी सन २०१८-१९ या आर्थीक वर्षाच्या मनपा अर्थसंकल्पात उपलब्ध करून देण्यात आलेल्या कामांऐवजी नागरीकांच्या मागणीनुसार नमुद कामांसाठी उपलब्ध तरतुद सदर कामांसाठी लेखाशिर्षासह वळती करणेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर करण्यात यावा.

प्रस्ताव:-

प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत बनेवाडी भागात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (भांडवली कामे जलनि:स्सारण र.रु.२५.०० लक्ष पान क्र.SCR-ZONE 09-P.NO.42 अ.क्र.०६) ऐवजी प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर येथील नुतनकन्या शाळेजवळील व इतर रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे.

प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत जहागीरदार कॉलनी भागात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (भांडवली कामे जलनि:स्सारण र.रु.२५.०० लक्ष पान क्र.SCR-ZONE 09-P.NO.42 अ.क्र.०७) ऐवजी प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत पगारिया कॉलनीतील श्री.चंदमल पगारीया यांचे घर ते बॅटमिंटन हॉल पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.

रेल्वेस्टेशन रोड ते बनेवाडी गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण व मजबुतीकरण करणे. (लेखाशिर्ष:शहरी भागात पुनर्डांरीकरण करणे. र.रु.७५.०० लक्ष, पान क्र.ZONE-

09-SPILL-P.No.274 अ.क्र.११) ऐवजी प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे.

सुचक:-श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद

मा.महापौर :विषय मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१०४ येथे खालील नमुद कामांसाठी सन २०१८-१९ या आर्थीक वर्षाच्या मनपा अर्थसंकल्पात उपलब्ध करून देण्यात आलेल्या कामांऐवजी नागरीकांच्या मागणीनुसार नमुद कामांसाठी उपलब्ध तरतुद सदर कामांसाठी लेखाशिर्षासह वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

१) प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत बनेवाडी भागात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (भांडवली कामे जलनि:स्सारण र.रु.२५.०० लक्ष पान क्र.SCR-ZONE 09-P.NO.42 अ.क्र.०६) ऐवजी प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर येथील नुतनकन्या शाळेजवळील व इतर रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे.

२) प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत जहागीरदार कॉलनी भागात विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. (भांडवली कामे जलनि:स्सारण र.रु.२५.०० लक्ष पान क्र.SCR-ZONE 09-P.NO.42 अ.क्र.०७) ऐवजी प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत पगारिया कॉलनीतील श्री.चंदमल पगारीया यांचे घर ते बॅटमिंटन हॉल पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे.

३) रेल्वेस्टेशन रोड ते बनेवाडी गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण व मजबुतीकरण करणे. (लेखाशिर्ष:शहरी भागात पुनर्डांरीकरण करणे.र.रु.७५.०० लक्ष, पान क्र. ZONE-09-SPILL-P.No.274 अ.क्र.११) ऐवजी प्रभाग क्र.१०४, बन्सीलालनगर अंतर्गत विविध विकास कामे करणे. विविध विकास कामे करणे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ८९६-

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मनपा अर्थसंकल्प सन २०१८-१९ मधील वार्ड क्र.७२ क्रांतीचौक करिता असलेल्या खालील कामाचे लेखाशिर्ष रहिवासीयांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे.

पान क्रमांक	अ.क्र.	जुने कामाचे नाव	नविन कामासाठी लेखाशिर्ष
Zone-09 spill p.no.296	१९१	वार्ड क्र. ७२, क्रांतीचौक अंतर्गत मित्रमंडळ हौसींग सोसायटी मधील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे रु.२४ लक्ष ९५ हजार	वार्ड क्र.७२ येथे सहकार नगर चौक ते दशमेश नगर डिलाईट बेकरी पर्यंतच्या रस्त्यालगत पेव्हरब्लॉक बसविणे रु.२४ लक्ष ९५ हजार
Zone-09 spill p.no.296	१९२	वार्ड क्र.७२ क्रांतीचौक अंतर्गत गुरुजन हौसींग सोसायटी येथील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे व मनपाच्या खुल्या जागेत पेव्हरब्लॉक बसविणे रु.१९ लक्ष ९९ हजार	वार्ड क्र. ७२ येथे ज्योतीनगर मधील श्री.सहस्त्रबुध्दे यांच्या घरापासुन ते श्री.पवार यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे रु.१९ लक्ष ९९ हजार
Zone-09 spill p.no.296	१९३	प्रभाग क्र.७२ क्रांतीचौक अंतर्गत गोपाळ टी चौक ते उत्सव मंगल कार्यालया पर्यंतच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे.र.रु.४९ लक्ष ७० हजार	१) वॉर्ड क्र.७२ येथे ओम प्राथमिक शाळेपासून ते श्री.पोहनकर यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.१० लक्ष. २) वॉर्ड क्र.७२ येथे श्री.पवार यांच्या

			घरापासून ते श्री.शर्मा यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.७ लक्ष. ३) वॉर्ड क्र.७२ येथे प्रा.शिऊरकर यांच्या घरापासून ते पिंक ॲण्ड ब्ल्यु शाळेपर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.७ लक्ष. ४) वॉर्ड क्र.७२ येथे श्री.देशमुख यांचे घर ते श्री.चव्हाण यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.७.०० लक्ष. ५) वॉर्ड क्र.७२ येथे श्री.भाकरे यांच्या घरापासून ते यश अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.१८ लक्ष ७० हजार.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक:-श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर **अनुमोदक:-**श्री.बन्सी ग्यानु जाधव

मा.महापौर :विषय मंजुर.

ठराव:-

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७२ क्रांतीचौक मध्ये खालील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

पान क्रमांक	अ.क्र.	जुने कामाचे नाव	नविन कामासाठी लेखाशिर्ष
Zone-09 spill p.no.296	१९१	वार्ड क्र. ७२, क्रांतीचौक अंतर्गत मित्रमंडळ हौसींग सोसायटी मधील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे रु.२४ लक्ष ९५ हजार	वार्ड क्र.७२ येथे सहकार नगर चौक ते दशमेश नगर डिलाईट बेकरी पर्यंतच्या रस्त्यालगत पेव्हरब्लॉक बसविणे रु.२४ लक्ष ९५ हजार
Zone-09 spill p.no.296	१९२	वार्ड क्र.७२ क्रांतीचौक अंतर्गत गुरुजन हौसींग सोसायटी येथील रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे व मनपाच्या खुल्या जागेत पेव्हरब्लॉक बसविणे रु.१९ लक्ष ९९ हजार	वार्ड क्र. ७२ येथे ज्योतीनगर मधील श्री.सहस्त्रबुध्दे यांच्या घरापासुन ते श्री.पवार यांच्या घरापर्यंत रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे रु.१९ लक्ष ९९ हजार
Zone-09 spill p.no.296	१९३	प्रभाग क्र.७२ क्रांतीचौक अंतर्गत गोपाळ टी चौक ते उत्सव मंगल कार्यालया पर्यंतच्या रस्त्यांचे कॉंक्रीटींग करणे.र.रु.४९ लक्ष ७० हजार	१) वॉर्ड क्र.७२ येथे ओम प्राथमिक शाळेपासून ते श्री.पोहनकर यांच्या घरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.१० लक्ष. २) वॉर्ड क्र.७२ येथे श्री.पवार यांच्या घरापासून ते श्री.शर्मा यांच्या घरापर्यंत

			रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.७ लक्ष. ३) वॉर्ड क्र.७२ येथे प्रा.शिऊरकर यांच्या घरापासून ते पिंक ॲण्ड ब्ल्यु शाळेपर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.७ लक्ष. ४) वॉर्ड क्र.७२ येथे श्री.देशमुख यांचे घर ते श्री.चव्हाण यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हरब्लॉक बसविणे. रु.७.०० लक्ष. ५) वॉर्ड क्र.७२ येथे श्री.भाकरे यांच्या घरापासून ते यश अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. रु.१८ लक्ष ७० हजार.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :स.सदस्य श्री.बल्लाळ व श्री.जंजाळ यांनी जसे प्रश्न मांडला. कॉंक्रीट जे.व्हॉइट टॅपींग ज्याला म्हणतो वृत्तपत्रात बातमी आली की,त्या रस्त्याला तडा गेल्या. रस्त्याचे काम निष्कृष्ठ दर्जाचे झाले. त्याबद्दल सदस्यांनी प्रशासनाला निदर्शनास आणून दिले. दखल घेतली नाही. उलट त्याचे बिल काढले. शेख मंहमद या एजन्सीला काम दिले. त्याचा पिरीयड असतो. तो रस्ता ठराविक विशिष्ट कालावधीपर्यंत मेन्टनन्स करायचा आहे. तोपर्यंत त्यास कुठल्याच प्रकारचे बिल देऊ नये. ही सक्त ताकीद आहे. क्वालीटीमध्ये तडजोड नको. यामूळे मनपाची बदनामी होते. ठेकेदार चांगले काम करीत नसेल व बील दिले जात असेल तर योग्य नाही. प्रशासनाने जबाबदारी स्विकारली पाहिजे. जर असे निष्कृष्ठ दर्जाचे काम होत असेल तर योग्य नाही. यात कोण दोषी आहे? त्याची चौकशी करावी श्री.बल्लाळ असेल श्री.जंजाळ असेल यांचे वार्डातील दोन्ही कामाची चौकशी करावी. अति.आयुक्त श्री.भालसिंग व शहर अभियंता यांनी चौकशी करावी. डिपॉजीट असेल देयक असेल चांगल्या दर्जाचे काम होत नाही तोपर्यंत बील देऊ नये. संपुर्ण चौकशी अहवाल आठ दिवसाच्या आत सादर करावा. उपाययोजनाही सुचवाव्या. सभागृहाच्या भावना लक्षात घेता आजची का.प.क्र.२३ हि सभा तहकूब करण्यात येते. हि तहकूब सभेची तारीख वेळ कळविण्यात येईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरित/-
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद